1171

**महावितरण**

(महाराष्ट्र शासन अंगीकृत )

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

दिनांक : १२/०८/२०१४

जा.क्र. : औसंवि/ब/ककनिस/५८ वी बैठक/२५३३६

# परिपत्रक

विषय : म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५८व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

********

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ५८ वी बैठक दि.१४/०७/२०१४ रोजी प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

(१) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दि. १६/०६/२०११ रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, तिन्ही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची संख्या व भौगोलिक परिक्षेत्रानुसार कार्यालये, विद्युत केंद्रे विचारात घेऊन परिमंडलनिहाय १२ विभाग करण्यात आले होते. तसेच १२ विभागांसाठी एकूण ८८० शिष्यवृत्तीचे वाटप, परिपत्रक क्र. औसंवि/ब/शिष्य/१८८३०, दि. ०५/०७/२०१२ अन्वये प्रसारीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येत आहे. शिष्यवृत्ती वाटप करावयाच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबतच्या विषयावर सदर बैठकीत चर्चा करण्यात येऊन म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५८ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार परिमंडलनिहाय १२ विभागांसाठी एकूण ११२० शिष्यवृत्तीचे खालीलप्रमाणे वाटप करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

| अ.क्र. | परिमंडळाचे नाव | भौगोलिक दृष्ट्या परिमंडळांतर्गत येणारे कार्यालये / विद्युत केंद्र | शिष्यवृत्तींची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सांघिक कार्यालय, मुंबई (भांडूप नागरी परिमंडळासह) | १) सां.का., प्रकाशगड (महावितरण)<br>२) सां.का., प्रकाशगंगा (महापारेषण)<br>३) सां.का., प्रकाशगड (महानिर्मिती)<br>४) भांडूप परिमंडळ (महावितरण)<br>५) वाशी अउदा परिमंडळ (महापारेषण)<br>(राज्य भार प्रेषण केंद्रासहित)<br>(अउदा पनवेल, एचव्हीडीसी, पडघे मंडल व अंबाझरी भार प्रेषण केंद्र, वगळून) | ८० |
| २. | कल्याण परिमंडळ (कोंकण परिमंडळ, रत्नागिरीसह) | १) कल्याण परिमंडळ (महावितरण)<br>२) कोंकण परिमंडळ (महावितरण)<br>३) वायु विद्युत केंद्र, उरण (महानिर्मिती)<br>(१०४० मे.वॅ. प्रकल्पासहीत)<br>४) जल वि.केंद्र, पोफळी (महानिर्मिती)<br>५) पनवेल अउदा मंडल (महापारेषण)<br>६) पडघे एचव्हीडीसी मंडल (महापारेषण) | १०० |
| ३. | अमरावती परिमंडळ | १) अमरावती परिमंडळ (महावितरण)<br>२) अमरावती अउदा परिमंडळ (महापारेषण)<br>३) औष्णिक विद्युत केंद्र,पारस (महानिर्मिती) | १०० |
| ४. | नाशिक परिमंडळ | १) नाशिक परिमंडळ (महावितरण)<br>२) नाशिक अउदा परिमंडळ (महापारेषण)<br>(खडका (भुसावळ) अउदा मंडल वगळून)<br>३) औ.वि.केंद्र, एकलहरे (महानिर्मिती)<br>४) जल वि.केंद्र, पैठण, एलदरी, वैतरणा व घाटघर (महानिर्मिती) | १०० |
| ५. | जळगाव परिमंडळ | १) जळगाव परिमंडळ (महावितरण)<br>२) औ.वि.केंद्र, भुसावळ (महानिर्मिती)<br>३) खडका (भुसावळ) अउदा मंडल (महापारेषण) | १०० |
| ६. | कोल्हापूर परिमंडळ | १) कोल्हापूर परिमंडळ (महावितरण)<br>२) कराड अउदा परिमंडळ (महापारेषण) | १०० |
| ७. | पुणे परिमंडळ | १) पुणे परिमंडळ (महावितरण)<br>२) पुणे अउदा परिमंडळ (महापारेषण) | ८० |
| ८. | बारामती परिमंडळ | १) बारामती परिमंडळ (महावितरण)<br>२) जल वि.केंद्र, विर, भाटघर, पवना, पानशेत व किल्लारी (महानिर्मिती) | ८० |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | औरंगाबाद परिमंडळ (नांदेड परिमंडळासह) | १) औरंगाबाद परिमंडळ (महावितरण)<br>२) नांदेड परिमंडळ (महावितरण)<br>३) औरंगाबाद अउदा परिमंडळ (महापारेषण)<br>( परळी वैद्यनाथ अउदा मंडल वगळून) | १०० |
| १०. | लातूर परिमंडळ | १) लातूर परिमंडळ (महावितरण)<br>२) औष्णिक वि. केंद्र, परळी (महानिर्मिती)<br>३) परळी वैद्यनाथ अउदा मंडल (महापारेषण) | ८० |
| ११. | नागपूर शहर परिमंडळ | १) नागपूर शहर परिमंडळ (महावितरण)<br>२) औष्णिक वि. केंद्र, कोराडी (महानिर्मिती)<br>(स्था. II कोराडी, चाचणी टी आय अॅन्ड सी, नागपूर व कोराडी निर्मिती प्रकल्प -II सहीत)<br>३) औष्णिक वि. केंद्र, खापरखेडा (महानिर्मिती) | १०० |
| १२. | नागपूर परिमंडळ | १) नागपूर परिमंडळ (महावितरण)<br>२) नागपूर अउदा परिमंडळ (महापारेषण)<br>(अंबाझरी भार प्रेषण केंद्रसहीत)<br>३) औष्णिक वि. केंद्र, चंद्रपूर (महानिर्मिती) | १०० |

(२) परिपत्रक क्र. काऔसंवि/ब/५२वी बैठक/३२८८६, दि. ०२/११/२०११ अन्वये म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या वतीने विविध कल्याणकारी योजनांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणे सादर करताना त्यात प्रत्येक विषयाबाबत प्रकरणपरत्वे एकसुत्रता आणण्यासाठी विहीत नमुना प्रपत्राची आवश्यकता होती. सदर बाब दि. १४/०७/२०१४ रोजी म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५८ व्या बैठकीत विचारार्थ मांडण्यात आली व सोबत जोडलेल्या विहीत नमुना प्रपत्रास मंजूरी देण्यात आली. तिन्ही कंपनीतील अधिकारी / कर्मचारी यांनी विविध कल्याणकारी योजनांची प्रकरणे सादर करताना ती सदर विहीत नमुना प्रपत्रातच सादर करावीत अन्यथा त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

(३) परिपत्रक क्र. काऔसंवि/ब/५२वी बैठक/३२८८६, दि. ०२/११/२०११ अन्वये कर्मचाऱ्यास मुलगी झाल्यास प्रोत्साहनपर रु. ५०००/- (रु. पाच हजार मात्र) या रकमेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र भेट देण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सदर योजना कर्मचाऱ्यास फक्त दोन अपत्यांपर्यंत अनुज्ञेय राहील असेही नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, या संदर्भातील प्रकरणे सादर करताना प्रकरणांमध्ये सदर अपत्य हे कितवे अपत्य आहे याचा स्पष्ट उल्लेख होत नसल्याने प्रकरणे निकाली काढताना अडचणी येतात.

दि. १४/०७/२०१४ रोजी झालेल्या म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५८ व्या बैठकीत सदर बाब विचारार्थ मांडण्यात आली व सोबत जोडलेल्या विहीत नमुना प्रपत्रास मंजूरी देण्यात आली. तिन्ही कंपनीतील अधिकारी / कर्मचारी यांनी सदर योजनेसंदर्भात प्रकरणे सादर करताना ती सदर विहीत नमुना प्रपत्रातच सादर करावीत अन्यथा त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

वरीलप्रमाणे निर्णयांची अंमलबजावणी परिपत्रक प्रसारीत झाल्याच्या तारखेपासून करण्यात येईल. सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **RAPDRP-Infoportal** या संकेतस्थळावर **Circular-Industrial Relations Department** या ठिकाणी प्रसिध्दीसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत (Hard Copy) कोणत्याही कार्यालयास देण्यात येणार नाही.

किशोर पवार

सोबत : विहीत नमुना प्रपत्र ०१ व ०२

(किशोर पवार)
सदस्य / सचिव, म.रा.वि.मं. क.क.नि.समिती तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :
१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

प्रत सस्नेह :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.
- यांना विनंती करण्यात येते की, महानिर्मिती / महापारेषण कंपनी अंतर्गत सर्व स्तरावर वरीलप्रमाणे निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी परिपत्रकास कंपनीअंतर्गत सर्वत्र विस्तृत प्रसिध्दी देण्याबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

# प्रपत्र-१

म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांना मुलगी जन्मल्यानंतर प्रोत्साहनपर रु. ५,०००/- या रकमेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र भेट देण्याबाबत विहीत नमुन्यातील प्रपत्र

(म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी अंतर्गत महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपन्यांतील कर्मचाऱ्याने भरावयाची माहिती)

१) कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व भ.नि.नि.क्र. :

२) कर्मचाऱ्याचा भ्रमणध्वनी क्र. :

३) कंपनीच्या सेवेत रुजू झाल्याची तारिख :

४) कामाचे ठिकाण :

५) मुलीचा जन्म दिनांक :

६) कर्मचाऱ्याचे कितवे अपत्य आहे. :

७) जन्म प्रमाणपत्र महापालिका / नगरपालिका/ ग्रामपंचायत यांनी दिलेले आहे का ? :

८) यापूर्वी सदर योजनेतंर्गत प्रोत्साहनपर रक्कम मंजूर झाली आहे काय ? असल्यास मंजूरीचा पत्र क्र. व दिनांक तसेच राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र क्र. व दिनांक. :

९) कागदपत्रांचा तपशिल : १)

२)

३)

मी, श्री. / श्रीमती--------------------------------- असे सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो / देते की, हे माझे पहिले / दुसरे अपत्य आहे, उपरोक्त माहिती ही खरी ही आहे.

उपरोक्त माहिती खोटी आढळल्यास मी, म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी अंतर्गत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनी अंतर्गत विविध सेवाविनियमाच्या आधारे कारवाईसाठी पात्र राहीन व त्याबाबत माझी कुठलीही तक्रार राहणार नाही. त्यास पुर्णपणे मी जबाबदार राहीन.

कर्मचाऱ्याची सही

नियंत्रण अधिकाऱ्याची सही व शिक्का